नगरपालिका शिक्षण मंडळ, चाळीसगाव, जिल्हा जळगाव यांच्या उर्दू कन्या शाळेसाठी श्रीमती छाया मोतीचंद बुंदेलखंडी यांच्या मालकीच्या भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीचे भाडे अदा करण्यास मंजूरीबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण १११७/प्र.क्र.१०९/ एस एम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २९ सप्टेंबर, २०१७

संदर्भ :

प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे क्र.क्र.प्राशिस/साने/ इमारत भाडे/२०१६-१७/ अंदाज -२०४/४९१, दिनांक ३१.०१.२०१७ चे पत्र

प्रस्तावना :

चाळीसगाव नगरपरिषद शिक्षण मंडळ, चाळीसगाव यांच्या उर्दू कन्या शाळेसाठी, श्रीमती छाया मोतीचंद बुंदेलखंडी यांची चाळीसगाव येथील मालकीची इमारत भाडेतत्वावर घेण्यात आली आहे. सदर इमारतीचे भाडे, कार्यकारी अभियंता, यांनी दिनांक २५.७.२००२ अन्वये दरमहा रु.८९००/- प्रमाणित केले आहे. त्यानुसार दिनांक १ जून, २००२ ते दिनांक ३० एप्रिल, २००५ या कालावधीचे इमारत भाडे दरमहा रु.८९००/- प्रमाणे प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, जळगाव यांच्या कार्यालयाकडून श्रीमती बुंदेलखंडी यांना अदा करण्यात आले आहे. पुढील कालावधीचे इमारत भाडे अदा न केल्याने श्रीमती बुंदेलखंडी यांनी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार दाखल केली होती. तसेच मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका ९२२०/२०१५ दाखल केली होती. मा.लोक आयुक्त यांनी श्रीमती बुंदेलखंडी यांना सदर शाळा इमारतीचे भाडे अदा करण्याबाबत शिफारस केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. सदर इमारतीच्या दिनांक १ जून, २००२ ते दिनांक ३० एप्रिल, २००५ या कालावधीच्या अदा केलेल्या इमारत भाडयास कार्योत्तर मंजूरी देण्याची व त्यांना दिनाक १ एप्रिल, २००५ पासूनचे इमारत भाडे अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याअनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय :

चाळीसगाव नगरपरिषद शिक्षण मंडळ, चाळीसगाव यांच्या उर्दू कन्या शाळेसाठी, श्रीमती छाया मोतीचंद बुंदेलखंडी यांच्या चाळीसगाव येथील मालकीच्या इमारतीचे दिनांक १ जून, २००२ ते दिनांक ३० एप्रिल, २००५ या कालावधीचे प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, जळगाव यांनी अदा केलेल्या इमारत भाडयास याद्वारे शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

श्रीमती बुंदेलखंडी यांना दिनाक १ एप्रिल, २००५ पासून दिनांक ३० जून, २०१७ पर्यंतचे १४७ महिन्यांचे इमारत भाडे दरमहा रु.८९००/- (रूपये आठ हजार नऊशे फक्त) प्रमाणे एकूण रू.१३,०८,३००/- (रूपये तेरा लक्ष आठ हजार तीनशे फक्त) इतके अदा करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर शाळा या इमारतीत सुरु असेपर्यंत दिनांक १ जुलै, २०१७ पासुन दरमहा रु.८९००/- प्रमाणे इमारत भाडे श्रीमती बुंदेलखंडी यांना अदा करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर इमारतीच्या वरील कालावधीच्या प्रलंबित इमारत भाडयाची रक्कम श्रीमती बुंदेलखंडी यांना एकरकमी अदा करण्यात यावी. आवश्यक निधी उपलब्ध नसल्यास सदर रक्कम कमाल ३ हप्त्यात अदा करण्यात यावी.

यावर होणारा खर्च " ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१- प्राथमिक शिक्षण, १०३- प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०३) इतर स्थानिक संस्थांना अनुदाने (०३) (०२) इतर स्थानिक संस्था (अनिवार्य) (२२०२ ०२०८) ३१. सहायक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच यापुढे मंजूर करण्यात येणाऱ्या इमारत भाडयासाठी अपेक्षित खर्च या लेखाशीर्षाखालील संबंधित आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका भाग-पहिला, उपविभाग एक-अ क्र.१०, नियम क्र.११५ आणि आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम क्र.१४७ (क) खालील टिप-१ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार काढण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१००३१३०१०६९१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2017.10.03 12:51:23 +05'30'

(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगाव
५. प्रशासन अधिकारी, नगरपरिषद, जळगाव
६. लेखा अधिकारी, कोषागार कार्यालय, नाशिक / जळगाव
७. निवडनस्ती (एस एम-१).